Dnyaneshwar Gramonnati Mandal's

**Hon. BALASAHEB JADHAV**

**ARTS,COMMERCE & SCIENCE COLLEGE, ALE**

Tal-Junnar, Dist.-Pune 412411.

Affiliated to S.P. Pune University, Pune

# 7.1.1

# Additional Information







**04/01/2022 Girls Student Counseling & Motivational video sharing program - Prof. Sangita Bharati (Chairman Women Development Cell) Addressed to the girls Students.**




**Motivational Video Sharing**







**Girls Common Room**









A suggestion box in college to address the problem

# विद्यार्थिनी व्यक्तिमत्व व सक्षमीकरण

विश्वविद्यालय अनुदान आयोग, नवी दिल्ली, महाराष्ट्र शासन, मुंबई, राष्ट्रीय महिला आयोग, नवी दिल्ली, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे व ज्ञानेश्वर ग्रामोन्नती मंडळाचे, मा. बाळासाहेब जाधव महाविद्यालय, आळे, ता. जुन्नर, जि. पुणे यांच्यावतीने विद्यार्थी विकास मंडळ अंतर्गत "**विद्यार्थिनी व्यक्तिमत्व व सक्षमीकरण**" या कार्यक्रमाचे **शनिवारी दि.१८/९/२०२१** रोजी ९:३० वा. आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालीय विद्यार्थिनीनी मानसिक दुष्ट्या सक्षम असावे व स्वतःचे व्यक्तीमत्व चांगले बनवावे व सक्षम व्हावे म्हणून "**विद्यार्थिनी व्यक्तिमत्व व सक्षमीकरण**" चे **ऑफलाईन/ऑनलाईन** आयोजन करण्यात आले होते. सदर कार्याक्रमचे उद्घाटन ज्ञानेश्वर ग्रामोन्नती मंडळाचे अध्यक्ष मा. भाऊदादा कुऱ्हाडे (ऑनलाईन), उपाध्यक्ष मा. उल्हासशेठ सहाणे, सचिव मा. बाळासाहेब गुंजाळ, खजिनदार मा. रोहिदासशेठ पाडेकर, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष मा. अर्जुनशेठ पाडेकर व प्राचार्य डॉ. प्रवीण जाधव (ऑफलाईन) यांचे हस्ते करण्यात आले होत. असे उपक्रम सर्व विभागानी राबवावेत असे सूचित केले व त्यासाठी संस्था सर्वतोपरी मदत करेन असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे व्याख्याते/तज्ञ व्यक्ती/पाहुणे व त्यांचा विषय याचा तपशील खालीलप्रमाणे.

: कार्यक्रम :

| अ. क्र. | कार्यक्रमाचे नाव | व्याख्याते/तज्ञ व्यक्ती/पाहुणे | सादरीकरण पध्दत | कार्यक्रमाची वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | विद्यार्थिनी व्यक्तिमत्व व सक्षमीकरण | **डॉ. सौ. प्रज्ञा कुलकर्णी,** (सहाय्यक प्राध्यापक) जयवंतराव सावंत इस्टीट्युट ऑफ मॅनेजमेंट अॅन्ड रिसर्च, हडपसर (पुणे)<br>**विषय:** विद्यार्थिनी व्यक्तिमत्व व सक्षमीकरण | ऑनलाईन | स. ९:३० ते ११:३० |

सदर कार्यामाचे आयोजन विद्यार्थी विकास मंडळाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश भिसे यांनी केले होते. या कार्यामाचे सूत्रसंचालन डॉ. गिरीजाप्रसाद क्षीरसागर, प्रास्ताविक डॉ. विलास गोर्डे यांनी केले होते. पाहुण्यांचा परिचय डॉ. सौ. अरुणा वाघोले तर आभार डॉ. सुधीर तांबे यांनी केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व ३५० हून अधिक विद्यार्थी ऑफलाईन/ऑनलाईन पद्धतीने आणि सर्व प्राध्यापक व शिक्षेकेतर कर्मचारी उपस्थित होते.

Jadhav

प्रभारी प्राचार्य
ज्ञानेश्वर ग्रामोन्नती मंडळाचे,
मा.बाळासाहेब जाधव कला,
वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,आळे.
ता.जुन्नर,जि.पुणे.(४१२४११)

# आळे महाविद्यालयात २५० विद्यार्थिनींना 'ज्युदो-कराटे' चे प्रशिक्षण

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व मा. बाळासाहेब जाधव कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आळे यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थी विकास मंडळ अंतर्गत 'निर्भय कन्या अभियान' योजने मध्ये विद्यार्थिनींच्या स्वसंरक्षणासाठी, शारीरिक, मानसिक व भावनिक इत्यादी स्तरावर सक्षम बनविण्यासाठी 'ज्युदो-कराटे' चे प्रशिक्षण दि. ८/२/२०२२ रोजी सकाळी ९:०० ते ११:३० या वेळेत आयोजीत केले होता. या प्रसंगी महाविद्यालयात २५० विद्यार्थिनींना 'ज्युदो-कराटे' चे प्रशिक्षण देण्यात आले.

सदर कार्यक्रमाचे उद्घाटन आळेफाटा पोलीस स्टेशन चे सहाय्यक पोलीस निरीक्षक मा. सुनील बडगुजर साहेब यांच्या हस्ते करण्यात आले. महाविद्यालय विद्यार्थिनींना अत्याचाराविरुद्ध तोंड देण्यास सक्षम करण्यासाठी त्यांच्या संरक्षणार्थ जागृती निर्माण करून त्यांना याबाबतचे शास्त्रोत प्रशिक्षण देणे गरजेचे आहे असे उद्घाटन प्रसंगी मा. सुनील बडगुजर साहेब म्हणाले.

आपल्या महाविद्यालयातील उच्च शिक्षण संपादन करणाऱ्या सर्वच मुली ग्रामीण भागातील असून दररोज पायी, बस व सायकलने महाविद्यालयात ये - जा करतात. या मुली आपल्या महाविद्यालयाच्या प्रमुख घटक आणि केंद्रबिंदू आहेत. या मुलींना अत्याचाराविरुद्ध तोंड देण्यास प्रशिक्षण देणे गरजेचे आहे असे व्याख्यात्या सौ. सरिता डुंबरे म्हणाल्या.

सक्षम बनविण्यासाठी 'ज्युदो-कराटे' चे प्रत्यक्ष प्रशिक्षण व स्व बचावासाठी काही टिप्स मा. संजय खंडागळे, कराटे प्रशिक्षक, आळेफाटा यांनी दिले. त्यांच्या बरोबर कु. शिवकन्या भंडागे, कु. सायली कुरकुटे, कु. सुष्टी गागरे, कु. श्रावणी डोंगरे, कु. रुद्रा काळे व कु. वैष्णवी भालेकर यांनी मुलींना प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले.

सदर कार्यक्रम प्रसंगी ज्ञानेश्वर ग्रामोन्नती मंडळाचे अध्यक्ष मा. भाऊदादा कुऱ्हाडे, महाविद्यालय विकास समिती मा. अर्जुनशेठ पाडेकर, उपाध्यक्ष मा. उल्हास सहाणे, सचिव मा. बाळासाहेब गुंजाळ, खजिनदार मा. रोहिदासशेठ पाडेकर, माजी जिल्हा परिषद सदस्य मा. प्रसन्न अण्णा डोके, किशोर कुऱ्हाडे, बबनराव सहाणे, गंगाराम गुंजाळ, माऊलीशेठ कुऱ्हाडे, अरुण हुलवळे, संपत गुंजाळ, राजूशेठ कुऱ्हाडे, तुकाराम गाढवे उपस्थित होते.

या उपक्रमाचे नियोजन महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. प्रवीण जाधव यांचे मार्गदर्शनाखाली विद्यार्थी विकास मंडळाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश भिसे, डॉ. विलास गोर्डे, प्रा. पल्लवी निखळ, प्रा. नूतन जोशी व विलास कुऱ्हाडे यांनी केले होते.

या कार्यक्रमास पत्रकार मा. विजय चाळक, मा. गोकुळ कुरकुटे व महाविद्यालयाचे प्रा. संजय वाकचौरे, डॉ. अरुणा बाघोले, डॉ. केशव बोरकर, डॉ. सविता रहांगडाळे, प्रा. रावसाहेब गरड, प्रा. बाम्हने, प्रा. छाया औटी, प्रा. सोनाली काळे, प्रा. प्रिया भुजबळ, प्रा. असिफा शेख, आदी प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश भिसे, सूत्रसंचालन डॉ. विलास गोर्डे तर आभार प्रा. नूतन जोशी यांनी केले.

प्रभारी प्राचार्य
ज्ञानेश्वर ग्रामोन्नती मंडळाचे,
मा.बाळासाहेब जाधव कला,

सकाळ | पुणे जिल्हा
पुणे, बुधवार, ९ फेब्रुवारी २०२२
TODAY
SakalNews @SakalMediaNews www.esakal.com Call Centre : 9225800800

# आळे येथे ज्यूदो-कराटेचे प्रशिक्षण

## जाधव महाविद्यालयातर्फे आयोजन; २५० विद्यार्थिनी झाल्या सहभागी

**आळेफाटा, ता. ८ :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व आळे (ता. जुन्नर) येथील बाळासाहेब जाधव कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थी विकास मंडळांतर्गत 'निर्भय कन्या अभियान' योजनेमध्ये विद्यार्थिनींच्या स्वसंरक्षणासाठी आणि शारीरिक, मानसिक व भावनिक आदी स्तरावर सक्षम बनविण्यासाठी ज्यूदो-कराटे'चे प्रशिक्षण देण्यात आले. त्यात २५० विद्यार्थिनींनी सहभाग घेतला.

या कार्यक्रमाचे उद्‍घाटन आळेफाटा पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक सुनील बडगुजर यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी ज्ञानेश्वर ग्रामोन्नती मंडळाचे अध्यक्ष भाऊदादा कुऱ्हाडे, महाविद्यालय विकास समितीचे अर्जुन पाडेकर, उपाध्यक्ष उल्हास सहाणे, सचिव बाळासाहेब गुंजाळ, खजिनदार रोहिदास पाडेकर, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रसन्न डोके, माऊली कुऱ्हाडे, किशोर कुऱ्हाडे, बबनराव सहाणे, गंगाराम गुंजाळ, अरुण हुलवळे, संपत गुंजाळ, राजू कुऱ्हाडे, तुकाराम गाढवे आदी उपस्थित होते.

यावेळी बडगुजर म्हणाले, ''महाविद्यालय विद्यार्थिनींना अत्याचाराविरुद्ध तोंड देण्यास सक्षम करण्यासाठी त्यांच्या संरक्षणार्थ जागृती निर्माण करून त्यांना याबाबतचे प्रशिक्षण देणे गरजेचे आहे.''

यावेळी सरिता डुंबरे म्हणाल्या, ''आपल्या महाविद्यालयातील उच्च शिक्षण संपादन करणाऱ्या सर्वच मुली ग्रामीण भागातील असून, दररोज पायी, बस व सायकलने महाविद्यालयात ये-जा करतात. मुली आपल्या महाविद्यालयाच्या प्रमुख घटक आणि केंद्रबिंदू असून, मुलींना अत्याचाराविरुद्ध तोंड देण्यास प्रशिक्षण देणे गरजेचे आहे.''

सक्षम बनविण्यासाठी ज्यूदो-कराटे'चे प्रत्यक्ष प्रशिक्षण व स्वबचावासाठी काही टिप्स कराटे प्रशिक्षक संजय खंडागळे, आळेफाटा यांनी दिले. तसेच, शिवकन्या भंडागे, सायली कुरकुटे, सुष्टी गागरे, श्रावणी डोंगरे, रूद्रा काळे व वैष्णवी भालेकर या मुलींनी प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले.

या उपक्रमाचे नियोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रवीण जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पल्लवी निखळ, नूतन जोशी व विलास कुऱ्हाडे यांनी केले. या कार्यक्रमास संजय वाकचौरे, डॉ. अरुणा वाघोले, डॉ. केशव बोरकर, डॉ. सविता रहांगडाळे, रावसाहेब गरड, छाया औटी, सोनाली काळे, प्रिया भुजबळ, असिफा शेख आदी प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश भिसे यांनी प्रास्ताविक; तर डॉ. विलास गोर्डे यांनी सूत्रसंचालन केले. नूतन जोशी यांनी आभार मानले.

★★★
पुणे । बुधवार
१.२.२०२२
किंमत : ₹ ४ ▪ वर्ष : २३ अंक : १४४ ▪ पृष्ठे : १२+८ = २०
आर. एन. आय. रजिस्ट्रेशन क्र. ७२०६३/१९९९
www.lokmat.com
epaper.lokmat.com

महाराष्ट्राचा मानबिंदू
लोकमत





आळे महाविद्यालय कराटे प्रशिक्षणात सहभागी विद्यार्थिनी.

# बाळासाहेब जाधव महाविद्यालयात विद्यार्थिनींना ज्युडो कराटे प्रशिक्षण

लोकमत न्यूज नेटवर्क

आळेफाटा : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व आळे येथील बाळासाहेब जाधव महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने निर्भय कन्या अभियानांतर्गत विद्यार्थिनींच्या स्वसंरक्षणासाठी ज्युडो-कराटे प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्घाटन आळेफाटा पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक सुनील बढगुजर, व्याख्यात्या सरिता डुंबरे, प्राचार्य डॉ. प्रदीप जाधव यांच्या उपस्थितीत व संस्थेचे अध्यक्ष भाऊदादा कुऱ्हाडे महाविद्यालय विकास समिती अध्यक्ष अर्जुन पाडेकर, उपाध्यक्ष उल्हास सहाणे, सचिव बाळासाहेब गुंजाळ, खजिनदार रोहिदास पाडेकर, ज्ञानेश्वर कुऱ्हाडे, प्रसन्न डोके, किशोर कुऱ्हाडे, बबनर सहाणे, गंगाराम गुंजाळ, संपत गुंजाळ, अरुण हुलवळे, राजेंद्र कुऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

विद्यार्थिनींना अत्याचाराविरुद्ध तोंड देण्यास सक्षम करण्यासाठी व संरक्षणार्थ जागृती करून त्यांना याबाबतचे प्रशिक्षण देणे गरजेचे असल्याचे मत सहायक पोलीस निरीक्षक सुनील बढगुजर यांनी यावेळी व्यक्त केले. सरिता डुंबरे यांनीही यावेळी स्वसंरक्षणाबाबत मुलींना मार्गदर्शन केले.

कराटे प्रशिक्षक संजय खंडागळे यांनी ज्युडो कराटेचे प्रत्यक्ष प्रशिक्षण व स्वबचावासाठी मार्गदर्शन केले. शिवकन्या भंडारे, सृष्टी गागरे, श्रावणी डोंगरे, रुद्रा काळे, वैष्णवी भालेकर, सायली कुरकुटे या मुलींनी कराटे प्रात्यक्षिके सादर केली. २५० विद्यार्थिनींना यावेळी कराटेचे प्रशिक्षण देण्यात आले.


कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश भिसे, डॉ. विलास गोडे, प्रा. पल्लवी निखळ, प्रा. नूतन जोशी व विलास कुऱ्हाडे यांनी या उपक्रमाचे नियोजन केले. शिक्षकवृंद संजय वाकचौरे, डॉ. अरुणा वाघोले, डॉ. केशव बोरकर डॉ. सविता रहांगडाळे, रावसाहेब गरड, छाया औटी, सोनाली काळे, प्रिया भुजबळ, अश्विका शेख आदींची उपस्थिती होती.





Board is showing that "Ragging" is banned in college campus





Watchman in the college campus for security at night









Lightning at night in college campus for security




Board displaying Helpline number of police station to complaint about teasing in campus




The board shows that chewing tobacco is banned in college campus.






Both Entries in to college are protected by Iron Gate.

**Dnyaneshwar Gramonnati Mandal's**
**Hon. Balasaheb Jadhav Arts, Commerce & Science College, Ale. Tal - Junnar, Dist. - Pune**

**GENDER ISSUSES**

## PARICIPATION OF NCC 2 GIRLS & SPORTS IN WRESTLING AT VILLAGE YATROTSUV

**Venue -** Akhada, (Dangal Maidan)

**Date:** 24/4/2022 TO 26/4/22 **Time** -Evening

## PARICIPATION OF NCC 2 GIRLS & SPORTS IN WRESTLING AT VILLAGE YATROTSUV

**Cash Prized Received From Gram Yatra Utasv Committee Date-24 to 26/4/2022, Sant Dnyaneshwar Yatra Utsav**

| Academic Year | Sr.No | Name of Girl Wrestler Student | Class | Funding Agency | Scholarship Received |
|---|---|---|---|---|---|
| 2021-22 | **1** | Kurkute Sayli Gokul | F.Y.B.Sc. | Santwadi, Ale | **3500/-** |
| | **2** | Chavan Monika Subhash | F.Y.B.A. | Wafgaon Yatra | **8000/-** |
| | **3** | Gadge Poonam Aruna | F.Y.B.Sc. | Wafgaon Yatra | **5000/-** |
| | **4** | Bhadange Shivkanya Dattatray | F.Y.B.A. | Santwadi,Ale | **4500/-** |
| | **5** | Vaishnavi Santosh Gadge | F.Y.B.A. | Santwadi,Ale | **1500/-** |
| | 6 | Sawni Shantaram Wagh | F.Y.B.Comm. | Santwadi,Ale | **1000/-** |





**2nd NCC girls participated in Wrestling**






**Prize Distribution of Wrestling**



लोकमत

कालिकामाता यात्रा उत्सव : महिला कुस्तिगिरांची लढत पाहण्यास गर्दी

# कांदळीचा आखाडा दंगल गर्ल्सनी गाजवला; दीड लाखांची बक्षिसे

लोकमत न्यूज नेटवर्क

**वडगाव कांदळी :** कांदळी (ता. जुन्नर) येथील ग्रामदैवत कालिका माता यात्रा उत्सवाच्या निमित्ताने कुस्तीच्या जंगी सामन्यांचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी जुन्नर, आंबेगाव, शिरूर, खेड, पारनेर, श्रीगोंदा या तालुक्यातून पैलवान आले होते. या कुस्त्यांमध्ये महिला कुस्तिगारांचा सामना पाहण्यासाठी मोठी गर्दी जमली होती.

दरवर्षी कालिका माता यात्रेला मोठ्या प्रमाणात कुस्त्यांचा आखाडा भरविण्यात येतो. परंतु गेली २ वर्षे कोरोनामुळे यात्रा रद्द करण्यात आल्याने हा आखाडा बंद होता. कांदळी येथे कुस्त्यांच्या आखाड्यासाठी सुसज्ज असे लाल मातीत स्टेडियम बनविले आहे तर सावलीसाठी मंडपाची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच उजेडासाठी लाईटची व्यवस्था करण्यात आली होती. दुपारी तीन वाजता सुरू झालेले सामने रात्री नऊ वाजेपर्यंत चालले होते.



**कांदळी (ता. जुन्नर) येथे महिला कुस्तिगीरांची कुस्ती जोडताना मान्यवर.**

यावेळी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष गणपतराव फुलवडे, विद्यमान सदस्य शरदराव लेंडे, पंचायत समिती सदस्य शामराव माळी, कांदळीचे लोकनियुक्त सरपंच विक्रम भोर, उपसरपंच अनिल भोर, संग्राम फुलवडे, प्रा. श्रीकांत पाचपुते, पत्रकार गोकुळ कुरकुटे, बबनशेठ घाडगे, अशोक बढे, सुरेश बढे, शिवशंकर मांडे, सुनील गुंजाळ, शांताराम घाडगे, मुरलीधर गुंजाळ, नवनाथ गुंजाळ यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

या आखाड्यात सायली कुरकुटे, सिद्धी पवळे, शिवकन्या भडांगे, स्वरा गाडे, सावनी वाघ, तन्वी रोकडे, वैष्णवी गडगे, पुनम गडगे, मोनिका चव्हाण या मुलींनी कुस्त्यांमध्ये सहभाग घेतला. समालोचक म्हणून एच. पी. नरसुडे यांनी, तर पंच म्हणून पैलवान सुरेश काकडे, चंद्रकांत घाडगे व युवराज घाडगे यांनी काम पाहिले.

### रंगल्या १५० कुस्त्या

या आखाड्यात एकूण १५० कुस्त्या पाहावयास मिळाल्या. पैलवानांना १ लाख ५० हजारांची बक्षिसे देण्यात आली. तसेच ठाणे मनपाचे नगरसेवक विकास रेपाळे, गणपतराव फुलवडे, बबनशेठ घाडगे, युवराज घाडगे व विशाल रेपाळे यांनी रोख बक्षिसे दिली.